# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 07.08.2025** **वार- गुरुवार**

---

**<u>निवडणूक आढावा</u>**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी मतदार संख्या, मतदान केंद्र, तिथल्या सोईसुविधा, आवश्यक मनुष्यबळ, उपलब्ध इलेक्टॉनिक मतदान यंत्र आदींबाबत सूक्ष्म पूर्वनियोजन करा, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले. पुणे विभागातील पाचही जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूक पूर्व तयारी संदर्भात वाघमारे यांनी पुणे विभागीय आयुक्त कार्यालयात आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बहुसदस्यीय पद्धतीने होतात; त्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीच्या तुलनेत या निवडणुकीत मतदान केंद्रांची संख्या वाढेल, राज्य निवडणूक आयोगाच्या निकषाद्वारे मतदान केंद्रांचं एकत्रिकरण करता येईल, असं वाघमारे म्हणाले.

**<u>हरघरतिरंगा</u>**

नागरिकांमध्ये देशभक्तीचं वातावरण निर्माण व्हावं या उद्देशाने केंद्र सरकारच्या सुचनेनुसार येत्या १५ ऑगस्टपर्यंत पुणे जिल्ह्यात ‘हर घर तिरंगा’ अभियान राबविण्यात येत आहे, सर्व संबंधित विभागाने समन्वय साधून हे अभियान यशस्वी करावं, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत. निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी 'हर घर तिरंगा’ अभियानाबाबत नुकताच आढावा घेतला.

सूचना श्रीमती कदम यांनी दिल्या. यावेळी सर्व संबंधित विभागाचे अधिकारी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

**<u>रूपाली चाकणकर</u>**

कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाला प्रतिबंध करण्यासाठी लागू करण्यात आलेल्या कायद्याच्या म्हणजेच पॉश कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य महिला आयोग कटिबद्ध आहे, असं आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी आज पुण्यात सांगितलं. राज्य महिला आयोग आणि एव्हीके पॉश ॲडव्हायझरी सर्व्हिसेस यांनी आयोजित केलेल्या पॉश कायदा जनजागृती कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज सभागृहात झालेल्या कार्यशाळेला विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. महिलांनी अत्याचाराविरुद्ध न घाबरता पुढे येऊन अंतर्गत तक्रार निवारण समितीकडे तक्रार दाखल करावी, असं आवाहन चाकणकर यांनी केलं.

जायका नोटीस

पुणे जायका प्रकल्पासाठी खोदकाम करताना मातीचा ढिगारा कोसळून एका मजुराचा मृत्यू झाला; या प्रकरणी संबंधित मूळ ठेकेदाराला कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी दिले आहेत. महापालिका या घटनेचा अहवाल तयार करत आहे. त्याचप्रमाणे 'जायका' मार्फतही या घटनास्थळाची तपासणी केली जाईल. तोपर्यंत इथल्या कामाला स्थगिती देण्यात आली आहे.

पुणेमनपा

पुणे महापालिकेत आयुक्त नवल किशोर राम आणि मनसेचे किशोर शिंदे यांच्यात झालेल्या वादाच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर आज पुणे महापालिकेतील अधिकारी, कर्मचारी वर्गाने काळ्या फिती लावून

महापालिकेच्या आवारात निषेध सभा घेतली. अशा प्रकारच्या घटना रोखण्यासाठी एक नियमावली करण्याची गरज असल्याची मागणी उपायुक्त माधव जाधव जगताप यांनी केली आहे.

**pcmc**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाने शहरातील विविध भागांमध्ये नव्या अग्निशमन केंद्रांच्या उभारणीसाठी नियोजन सुरू केलं आहे. काही केंद्रांचं काम अंतिम टप्प्यात आहे, तर काहींसाठी जागा निश्चिती आणि निविदा प्रक्रिया सुरू आहे. सध्या शहरात १० अग्निशमन केंद्रे कार्यरत आहेत.

**वृक्षारोपण**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या उद्यान आणि वृक्ष संवर्धन विभागाच्या वतीने उद्यान देखभाल आणि व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं. याचं उद्घाटन आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते झालं. वृक्षारोपण करताना मातीमध्ये कोणता घटक मिसळणे आवश्यक आहे, पाणी किती गरजेचे आहे, खड्डा कसा असावा, याबाबतचे तंत्रज्ञान समजून घेण्यासाठी या प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. पुढील काळात प्रत्येक तीन ते चार महिन्यात असे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

**परिषद**

राज्यातील शेतकरी नेत्यांनी एकत्रित येत उद्या पुण्यात शेतकरी हक्क परिषदेचं आयोजन केलं आहे. सकाळी साडे १० वाजता नवी पेठेतील पत्रकार भवनात ही परिषद होणार आहे, अशी माहिती परिषदेचे संयोजक महेश बडे यांनी दिली.

**रेल्वे**

यावर्षी एप्रिल ते जुलै या कालावधीत पुणे विभागात सुमारे दीड लाख रेल्वे प्रवाशांनी तिकीट न काढता प्रवास केला. त्यांच्याकडून साडे आठ कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असल्याची माहिती मध्य रेल्वेने दिली आहे.

**परवानेनिलंबित**

युरिया खताच्या साठ्यात तफावत आढळल्यानंतर राज्यातील ८६ कृषी विक्री केंद्रांचे परवाने निलंबित, तर आठ केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. गुणनियंत्रण संचालक अशोक किरनळ्ळी यांनी ही माहिती दिली. ज्या विक्रेत्यांकडे 'ई-पॉस' वरील खत साठा आणि प्रत्यक्ष साठा यामध्ये फरक आढळेल त्या विक्रेत्यांवर कारवाई करून परवाना रद्द करण्याबाबत अधिकाऱ्यांना सूचना दिल्या असल्याचे कृषी विभागाने सांगितलं.

**जनावरांसाठीआरोग्य**

पुणे जिल्हा दूध संघ म्हणजेच कात्रज डेअरीकडून जिल्हाभरात जनावरांसाठी मोफत आरोग्य शिबिर राबवण्यात आलं. जिल्ह्यात सात ते ३१ जुलैपर्यंत ७८ गावांत राबविण्यात आलेल्या कार्यक्रमांत आठ हजार १५ जनावरांची मोफत तपासणी करण्यात आली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज हलका पाऊस पडला. उद्याही ढगाळ हवामानासह हलक्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**